**DEPARTMENT OF MARATHI**
**Manuscript**

Compilation of poetry by women students' in rural; area based on the question paper M.A.I Marathi a Folk Literature. The manuscript of collection working was published on belhalf of the Marathi Department.

# लोकसाहित्यातील उखाणा



पारंपरिक लोकजीवनातील
स्त्रियांचे उखाणे

संपादक -
डॉ. स्वाती विठ्ठलराव चोरे

## संपादकीय ........



• 'लोकसाहित्य' ही एक व्यापक संज्ञा आहे. लोकसाहित्यात परंपरेने चालत आलेल्या लोकजीवनाचा केवळ शब्दबद्ध आविष्कारच नसतो, तर लोकजीवनाची जीवन जगण्याची पद्धती, त्यांचे सण, उत्सव, नृत्य, उपजीविकेची व मनोरंजनाची साधने, संपर्क माध्यमे, जीवन जगण्याची अनेक विविध पर्याय इत्यादी अनेकांचा समावेश होतो. आज केवळ लोकसाहित्यात प्राधान्याने लोकगीत, कथा, नृत्य-नाट्ये, विधी इत्यादींचाच अभ्यास होत आहे नाही, तर आपल्या संस्कृतीचे जतन करणाऱ्या म्हणी, उखाणे, अहाणे, लोकोक्ती, वाक्प्रचार या लोक-वाङ्मयाचा अभ्यास केला जातो. स्त्री-पुरुषांच्या सुख-दुःखांचे प्रगटीकरण लोकवाङ्मयातून होते. स्त्रीजीवनाची ओळख स्त्रीगीतातून ओव्या, सण, उत्सवाच्या गाण्यातून, व्रतवैकल्यातून, नवसातून होत असते. या लोकसाहित्यातून स्त्रीमनाचा ठेवा जोपासण्यासाठी वर्षानुवर्षे चालत आलेल्या 'उखाणा' हा प्रकार अतिशय लोकप्रिय प्रकार होय. तसेच थट्टा-मस्करी करून कुटुंबात आनंद निर्माण करू शकते.

'उखाणा' म्हणजे पति अगर पत्नीचे नाव गुंफून सुंदर शब्दरचनेने यमक साधून तयार केलेली रचना होय. पिढ्यानं पिढ्या चालत आलेले हे उखाणे म्हणजे लोकवाङ्मयाचा अनमोल असा खजिनाच. शब्दालंकार लेवून आलेल्या बोली भाषेतल्या जणू या चालत्या बोलत्या अजरामर कविताच! हे उखाणे कुणी लिहून, वाचून पाठ केलेले नाहीत, तर केवळ एका स्त्रीकडून दुसऱ्या स्त्रीकडे दुसरीकडून तिसऱ्या स्त्रीकडे असेच त्यांचे तोंडी संक्रमण होत गेलेले आहे. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती, पण आज तशी परिस्थिती नाही. एकंदरीत जीवन खूप बदलले आहे, परंतु उखाणा ही हिंदू जीवन पद्धतीने जगाला दिलेली अनमोल देणगी आहे, त्यामुळे त्यांच्या मंगल प्रसंगी तरी उपयोग होतोच नाहीतर वधु-वरांना नाव कसे घ्यावे याचे कोडे पडते म्हणून अशा-

## विद्यार्थ्यांची नावे –

- प्रेमकुमार म. जवणे.
- कु. दिपाली ग. गावंडे.
- कु. अंकिला द. पाटील.
- कु. प्रणाली श. गणोरकर
- कु. नम्रता प्र. रक्षक
- कु. पुनम ग. गावंडे
- कु. शुभांगी प. जोगेकर
- कु. मोनिका र. लडस
- कु. शुभांगी व. निंबोरकर
- कु. वैशाली ग. थेटे
- कु. दिपाली व. निकम
- कु. स्नेहल डि. गणोरकर
- कु. गायकी बा. निचत
- अक्षय अ. खोब्रागडे
- कु. नम्रता ह. शिरभाते
- गौरव स. कोहळे
- कु. पुजा ग. तरार
- कु. विजया श. होले
- कु. रूपाली म. बन्सोडे
- कु. रेणुका श. ठाकरे
- कु. वैष्णवी ह. डहाके
- कु. स्वाती वि. निमजे
- कु. पल्लवी न. ठाकरे
- मनोज र. ठोसर
- कु. प्रणाली प्र भवते.

एम. ए. भाग - १.

- सह्याद्री पर्वतावर होते शिवरायांचे दर्शन, ....... रावांच्या प्रेमासाठी अखंड जीवन अर्पण.
- आकाशात उडणाऱ्या राजहंसाचे काळे, निळे डोळे, ....... रावांचे मन माझ्या हृदयात फिरे.
- कण्व ऋषींच्या आश्रमात शकुंतलेचे माहेर, ....... रावांनी दिले मला सौभाग्याचे आहेर.
- कळी उमलली खुदकन हसली स्पर्श होता वाऱ्याचा, भाळी कुंकुम टिळा रेखीते ...... रावांच्या नावाचा.
- मित्र-मैत्रिणींच्या मेळ्यात हास्याचा येत उधाण शब्दांचे सुटतात बाण-जीव होतो हैराण पण हळूच सांगते कानात, ....... राव आहेत माझे जीव की प्राण.
- सोन्याच्या ताटात खडीसाखरेची वाटी, ....... रावांचं नाव घेते सात जन्मासाठी
- आई वडीलांच्या वियोगाचे दुःख ठेवून मनात हसतमुखाने प्रवेश केला मी, ....... रावांच्या जीवनात.
- तुळशीची करते पूजा शंकराची करते आराधना, ....... रावांना दीर्घायुष्य लाभो हीच परमेश्वराला प्रार्थना.
- खाण तशी माती, ....... राव माझे पती आणि मी त्यांची सौभाग्यवती.
- बागेत फूल गुलाबाचे, माझ्या मनात नाव ....... रावांचे
- तिरंगी झेंड्यावर अशोकचक्राची खूण, नाव घेते ....... ची सून.
- दिन दुबळ्यांचे गाऱ्हाणे परमेश्वराने ऐकावे, आई वडील हेच देवा सारखे मिळाले, आणखी काय मागावे.
- विटावर विटा सात विटा, ....... रावांचं नाव घेते सगळी आता फुटा
- जीवनाच्या सागरात पती पत्नीची नौका, ....... रावांच नाव घेते, सर्वांनी लक्ष देवून ऐका.
- पीढ्यावर पीढे पाच पिढे, ....... रावांचे नाव घेते तुमच्या सर्वांच्या पुढे.
- मुंबई ते पुणे पेरला होता लसून ....... राव गेले थकून, आणा त्यांना पालखीत बसून.
- खोक्यात खोका टि.व्ही.चा खोका ....... राव गप्प बसा नाही तर देईन ठोसा.
- मोगऱ्याचा गजरा लावते मी वेणीला, ....... रावांची आठवण येते प्रत्येक क्षणाला
- छोट्याश्या वाटीत घास भरवते बाळाला, रावांचे नाव घेताना लाज कसली मित्राला.

— अक्षय अ. भोरखंडे.

• पित्याने दिली विद्या, मातेने दिले गृहशिक्षण, ....... राव मिळाले हेच माझे भूषण.

• शाळेच्या ग्राउंडवर खेळत होते गेम, तिकडून आले ....... राव त्यांनी विचारले व्हॉट इज युवर नेम.

• माहूर गडावर रेणुकेची वस्ती ....... रावांचे मिळावे आयुष्य माझ्यापेक्षा जास्ती.

• शितल आहे चांदणे, वारा आहे मंद, ....... रावांना सिनेमाचा भारीच छंद.

• वैचारिक प्रगल्भतेचे ....... राव मला लाभले म्हणून जीवनी स्वप्न माझे साकारले.

• कर्ताकरविता परमेश्वर त्यावर टाकले मी भार, ....... रावांचे नाव घेते, कर देवा नौका पार.

• कळत नाही माझेच मला, आहे स्वप्न की भास, ....... रावांचे नाव घेते तुमच्यासाठी खास.

• विनय हाच खरा स्त्रीचा अलंकार, ....... रावांच्या सहवासात होवो ध्येय आशा साकार.

• एकनाथांच्या घरी, हरी पाणी भरतो कावडीने, ....... रावांच्या नाव मी घेईन आवडीने.

• लज्जेचे बंधन असले तरी नाव आहे ओठी ....... रावांचे नाव घेते तुमच्या आग्रहासाठी.

• नेत्रींच्या निरंजनात तेवते प्रीतीची फुलवात, ....... रावांच्या साथीने संसाराला करते सुरुवात.

• बरेच दिवसांनी आकांक्षा आज आली साकार, ....... रावांनी केलाच माझा पत्नी म्हणून स्वीकार.

• मुंग्यांच्या सहवासात विकसते कळी, ....... रावांच्या साक्षीने लिहिते सौभाग्याच्या ओळी.

• केस माझे कुरळे, सावली पडली गालावर, ....... रावांचे नाव घेते मैत्रिणींच्या बोलावर -

- कु. दिपाली वि. निकम.

## एम० ए० भाग - १.

- कोल्हापूरला आहे महालक्ष्मीचा वास, मी भरविलो ....... ला जलेबीचा घास.
- पुरणपोळीत तूप असावे साजूक .... आहेत आमच्या फार नाजूक.
- सितेसारखे चारित्र्य, लक्ष्मी सारखं रूप, ....... मला मिळाली आहे अनुरूप.
- गाडीत गाडी डेक्कन क्वीन ....... आहे माझी ब्युटी क्वीन.
- सुर्याच्या किरणांचा प्रकाश पडला लिंबाच्या झाडावर ........चा पुर्णपणे हक्क.
- प्रेमाच्या रानात नाचला मोर .......शी केलं लग्न नशीब माझं थोर.
- कृष्णाला बघुन राधा हसली ....... माझ्या हृदयात जाऊन बसली.
- गोड मधुर आवाज जशी कृष्णाची बासरी ....... ला घेऊन जातो मी तिच्या सासरी.
- प्रेमाची कविता, प्रेमाचे लोक ....... माझी लाखात एक.
- सर्वी सासरची गोडी अन् फुलांचा सुगंध ....... सर्वांच्या संसारात, स्वर्गाचा आनंद
- मंदिराचे वैभव, परमेश्वराची मूर्ती, ....... सर्वांचे नाव घेऊन करते इच्छापूर्ती.

— गौरव स. कोल्हे

- लावित होते कुंकू त्यात पडला मोती ....... राव सारखे मिळाले पती, भाग्य मानू किती.
- चंदनाच्या झाडाला नागिणीचा वेढा, सौ. ...... च्या आणि माझा जन्मोजन्माच्या जोडा.
- हातात घालत्या बांगड्या, गळ्यात घालती कुडी, ....... रावांचे नाव घेते सत्यनारायणाच्या दिवशी.
- चांदीच्या ताटात अगरबत्तीचा पुडा - ....... च्या नावाने भरला हिरवा चुडा.
- लाल लाल मणी तोडले, काळे काळे मणी जोडले ........ रावांसाठी मी माहेर सोडले.
- अत्तराचा सुगंध दरवळला चहुकडे, ....... रावांच्या लौकिक होऊ दे सगळीकडे.
- काही शब्द येतात ओठातून ........ चे नाव घेते मग हृदयातून
- ताजमहल बांधायला कारागीर होते कुशल, ..... चे नाव घेतो तुमच्यासाठी स्पेशल.
- अजिंठा वेरुळची शिल्पे आहेत सुंदर ....... माझी सर्वांपेक्षा.
- एक होती चिऊ, एक होता काऊ, ....... चे नाव घेतो आता नका लावू.
- निळं पाणी, निळं आकाश, हिरवे हिरवे रान ....... चे नाव घेतो ठेवून सर्वांचा मान -

— कु. गायत्री बा. निचत

एम. ए. भाग - २.

- समुद्राच्या काठी नागनागीणीची वस्ती, ....... रावांना आयुष्य मिळो माझ्या पेक्षा जास्ती.
- आंब्याच्या झाडाला कोवळी पत्ती, ....... रावांच्या डोक्यावर मोत्यांची छत्री.
- दारी होती तुळस, तिला घालीत होते, पळी पळी पाणी आधी होते आईबापाची तान्ही, मग झाली रावांची राणी.
- पुण्यात जन्मले, गंगेत न्हाले आणि रावांच्या जिवासाठी मुंबईत आले.
- उभी होते मळ्यात, नजर गेली तळ्यात, हजाराची कंठी, ....... रावांच्या गळ्यात.
- हरे राम, हरे क्रिष्णा नामाचा होतो गजर, ....... रावांचे नाव घेते सोडा माझा पदर.
- सूर्य चंद्र आहे आकाशाचे सोबती, ....... नाव घेते साथा जन्माचे सोबती
- रूसलेल्या राधेला कृष्ण म्हणतो हस ....... रावांनसाठी मी आहे खास.
- राम बसले राज्यावर, सीता बसली लंकेतर रावांचे ....... तेज माझ्या कपाळावरील कुंकावर.
- सागराला आली भरती, नदीला आला पूर ....... रावांच्या आयुष्यासाठी माहेर केले दूर.
- संस्कृत भाषेत नदीला म्हणतात सरीता, ....... रावांचे नाव घेते तुमच्या आग्रहाखातिर।
- गळ्यात मंगळसुत्र, मंगळसूत्रात डोरलं, ....... रावांचं नाव माझ्या हृदयात कोरलं
- अनुसया मातेच्या मंदीरात निंबाची सावली, ....... रावांना जन्म देणारी धन्य ती माउली.
- बरेच दिवसांची आकांक्षा आज झाली साकार, ....... रावांनी केला माझा पत्नी म्हणून स्वीकार.
- अमरावतीच्या अंबादेवीला भरजारी परकर, ....... रावांचे नाव घेते सोडा लवकर.

कु. मोनिका र. तडस

## एम.ए. भाग - १.

- लेक लाडकी कुणाची, आई बापाची, सून कुणाची, सासू सासऱ्यांची राणी कुणाची ...... रावांची.
- पानोपानी फुल फुलावे, त्यात गहिरे रंग भरावे, ....... मी रावांच्या प्रेमळ सहवासात अस्तित्व मी माझे विसरावे.
- सागरात सरिता जीवनात ज्योती ...... राव माझे पती मी त्यांची सौभाग्यवती.
- लहान मुले असतात खूप गोजिरवाणी, ....... राव माझे संग्राम आणि मी त्यांची देवयानी.
- गुलाबाचे फुल मधोमध असते पिवळे, ....... राव दिसतात कृष्णासारखे सावळे.
- येत होती जात होती घड्याळ्यात पाहत होती, घड्याळ्यात वाजले एक ....... रावांचे राव होते .... --ची लेक.
- आपुलकी असेल तर जीवन सुंदर, संदेशाची आवड असेल तर मोबाईल सुंदर, फुले असेल तर बाग सुंदर गालातल्या गालात एक छोटसं हसु असेल तर चेहरा सुंदर .......
- पेटी वाजे तबला वाजे मंजुळ वाजे बासरी, ...... रावांच्या सप्तसुरांना साथ मिळाली हसरी.
- बागेत फूल गुलाबाचे, माझ्या मनात नाव ....... रावांचे.
- दिन दुबळ्याचे गाऱ्हाणे परमेश्वराने ऐकावे, ....... रावांसारखे पती मिळाले आणि आणखी काय मागावे.
- एक दिवस अचानक आला एक घोडेस्वार श्वेत रंगी घोड्यावर ....... रावच होते ते जादुगार
- मणित मणी काळे मणी, ....... राव माझ्या मनाचे धनी.
- केंद्रात केंद्र दुध केंद्र माझ्या नशिबात पडले हे काळे चुचुंदर.

- कु. नम्रता प्र. रक्षक

एम. ए. भाग - २.

- संसार रुपी वेलीचा, गगनात गेला झुला, ....... रावांचे नाव घेते, आशीर्वाद द्यावा मला.
- पतीव्रतेचं व्रत घेवून, नम्रतेने वागेन, ....... रावांचं नाव घेतांना आशीर्वाद मागेन.
- चांदीच्या होते कुंकु, त्यात पडला मोती, ....... रावां सारखे मिळाले प्रतिभाग्य मानू किती.
- ताजमहाल बांधायला, कारागीर होते कुशल, ....... रावांचे नाव घेते तुमच्यासाठी स्पेशल.
- कण्वमुनींच्या आश्रमात शंकुतलेचे माहेर, ....... रावांनी केला मला सौभाग्याचा आहेर.
- शंकराची पुजा पार्वती करते खाली वाकून, ....... रावांचे नाव घेते सर्वांचा मान राखुन.
- श्री. विष्णूच्या मस्तकावर सदैव असतो शेष ....... रावांचे नाव घेवून करते गृह प्रवेश.
- यमुना जलावर पडली ताजमहालाची सावली, ....... रावांची जन्मदाती धन्य ती माउली.
- अभिमान नाही संपत्तीचा, गर्व नाही रुपाचा, ....... रावांना घास भरविते वरण-भात-तुपाचा.
- लोकमान्य टिळक स्वराज्याचा हिरा, ....... रावांचे नाव घेवून उखाणा करते पुरा.
- मी नव्हती सुंदर तरीही मला निवडले, ....... रावांचे हेच रुप मला फार आवडले.
- नीळ नभाच्या तबकात नक्षत्रांचा हार, ....... रावांच्या स्वभाव आहे फारच उदार.
- शिक्षणाने विकसित होते संस्कारित जीवन, ....... रावांच्या संसारात राखीन मी सर्वांचे मन.
- इंद्र धनुष्यात असतात सप्तरंग, ....... रावांच्या संसारात मी आहे दंग.

कु. नम्रता ह. शिरभाते.

## एम. ए. भाग - १.

- कपाशाची शेत बाई बोंडानी फुलली .......रावांचे दर्शन होताच माझी कळी फुलली.
- जुळी बाई जुळी, दुर्वांची जुळी, .......राव म्हणतात नेस आज पैठणी साडी.
- हंड्यावर हंडा, गुंड्यावर गुंडा आणि गुंड्यावर मोर .......राव खोडी काढू नका बसलेत मोठे थोर.
- गुलाबाच्या फुलाला सुगंधी वास, .........राव आहे बी.ए. पास.
- अभिजात नाही संपत्तीचा, गर्व नाही रुपाचा .......रावांना घास घालते वरण - भात - तुपाचा
- श्रीकृष्णाने पण केला, रुक्मिणीशी वरीन, .........रावांच्या जिवनात आदर्श संसार करीन.
- राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, दशरथाला पुत्र चार .......रावांनी घातला मला मंगळसूत्राचा हार.
- नाजुक अनारसे; साजूक तुपात तळावे .........रावांसारखे पती जन्मोजन्मी मिळावे.
- सर्वांपुढे नमस्कारासाठी जोडले दोन्ही हात .......रावांचे नाव घेते रपण सोडा माझी वाट
- आमच्या दोघांचे स्वभाव आहेत complementary .......चे नाव घेऊन करते, घरात पटकन Entry.
- नवे घर, नवे लोक, नवी नवी नाती, संसार होईल मस्त .......राव असता सोबती.
- नव्या नव्या घरात, कोणीही जाईल गांगरुन ....... चुकली कुठे तर घ्या जरा सावरुन
- सुंदर रांगोळ्यांनी आणली, पंगतीला शोभा .........ला भरवतीय घास, सर्वांनी बघा.
- माझ्या गुणी .........ला, पश रगड्यांनी निरखून ....... जणू कोहिनूर हिरा. आणलाय आणि पारखून
- सुखी संसाराची करतीय, आजच आला सुखात ........ वर ठेवा कायम, तुमचा प्रेमळ मायेचा हात-

- कु. पूणा ग. तरार.

- नदीच्या काठावर कृष्णा वाजविते बासरी, ....... रावांचं नाव घेते, मी आली सासरी.
- अंगणी होती उंबर, उंबरीला आला बार, ....... रावांनी साडी घेतली हिरवी हिरवी गार.
- दल्लांच्या देवळात अगरबत्तीचा वास, ....... रावांना भरवले पेढ्याचा घास.
- महादेवाच्या पिंडीवर बेल वाहते वाकून, ....... रावांचे नाव घेते, आपल्या सर्वांचा मान राखून.
- मोर्शी ते वरुड पेरला लसून, ....... राव बसले रुसून मी दिली त्यांना चॉकली करून.
- जेजुरी-चा खंडोबा, तुळजापुरची भवानी, ....... रावांचे नाव घेते मी आहे त्यांची अर्धांगिनी.
- सोन्यांचा अंगठीवर नागांची खुण, ....... रावांचे नाव घेते, ...... सून.
- केळीचं पान टरटर फाटते, बायकोचं नाव घेतो तर लय भारी वाटते.
- कृष्णाने लिहिली भगवद्गीता, ....... राव माझे राम तर मी त्यांची सीता.
- सात समुद्राच्या पलीकडे कृष्णा वाजवितो बासरी, ....... नाव घेते सुखी आहे मी सासरी.
- मंगळसूत्राच्या दोन वाटी सासर आणि माहेर, ....... रावांनी दिला मला सौभाग्याचा अहेर.
- शुभमंगल प्रसंगी अक्षदा पडल्या माथी, माझे ....... माझे राव हे आता जिवनसाथी
- नाव द्या नाव द्या अग्रलेखासाठी, ....... रावांचे नाव घेते ओठावरती पण थांबले होते उखाणे साठी.
- हिरव्या साडीला काठ आहे जरदारी, ....... रावांचे नाव घेते शालु नेसुन भारी.

— कु. पुनम ग. गावंडे.

एम.ए.भाग-१.

- अंगणात वृंदावन, वृंदावनात तुळस, रावांचे नाव घेताना, कसला आला आळस.
- स्वातंत्र्याच्या होमकुंडात विरांनी घेतली उडी....... रावांच्या नावाने घालते, गळ्यात मंगळ सूत्राची जोडी.
- शिक्षणाने विकसील होते, संस्कारीत जीवन ....... रावांच्या संसारात रंगीन मी सर्वांचे मन
- चंद्राला आला उदय अन् समुद्राला आली भरती ....... रावांच्या प्रेमाने सर्व दुःख हरती.
- सुख-दुःखाच्या धाग्यांनी जीवन वस्त्र विणले....... रावांच्या सहवासाचे भाग्य मला लाभले.
- वसंतातली मंदीराच्या गाभाऱ्यात विठ्ठलाची मूर्ती ....... रावांची होवो सगळीकडे कीर्ती.
- सायकल चालते वेगाने, नस धावते क्रमाने ....... रावांचे नाव घेते, तुमच्या म्हणण्याप्रमाणे
- विद्येचे माहेर घर आहे म्हणतात पुणं....... रावांच्या सहवासात / जीवनात मला नाही उणं.
- टिळकांच्या केसरी अत्र्यांच्या / मार्मिकार....... रावांची विद्वत्ता हाच माझा अलंकार.
- ज्ञानदानाने करते मी कर्तव्य पूर्ती ....... रावांच्या शब्दांनी मिळते मला स्फुर्ती.
- घोषातील थंड वारा घडीतो माझ्या अंगाला ....... रावांचे नाव घेतो सूर्यनारायणाच्या साक्षीला.
- चंदेरी सागरात रुपये लाटा ....... रावांच्या सुख-दुःखात अर्धा माझा वाटा.
- काचेच्या ग्लासात गुलाबी शरबत ....... राव गेले मुंबईला मला नाही करमत.

— कु. प्रणाली सु. गणोरकर.

एम. ए. भाग - २.

- हिमालय पर्वतावर बर्फाच्या राशी, ....... चे नाव घेते लग्नाच्या दिवशी
- सोन्याचे मंगळसूत्र सोनाराने घडविले, ....... रावांचे नाव घ्यायला सगळ्यांनी अडविले.
- एक तीळ सातजण खाई, ....... ना जन्म देणारी धन्य ती आई.
- कलीयुगात घडलाय यांच्यारूपाने चमत्कार, ....... रावांचे नाव घेऊन सर्वांना करते नमस्कार.
- काही शब्द येतात ओठातून, काही येतात गळ्यातून, ....... चं नाव येते मात्र थेट हृदयातून.
- उखाणा घेऊन भगिणीच्या सत्वगुणांना मिळतो वाव, आज आहे मंगळागौरी ....... चे घेते मी नाव
- हंड्यावर हंडे सात त्यावर ठेवली परात, ....... बसले दारात मी जाऊ कशी घरात.
- अन्नावळीवर पत्रावळी, पत्रावळीवर भात, भातावर वरण, वरणावर तूप, तुपासारखे रूप, रूपासारखा जोडा, ....... चे नाव घेते वाट माझी सोडा.
- काचेच्या बशित आंबे ठेवले कापून, ....... रावांच रावांच नाव घेते सर्वांचा मान राखून.
- भाव तेथे शब्द, शब्द तेथे कविता, ....... चे नाव घेते तुमच्या आग्रहाकरिता.
- कळी हसेल फुल उमलेल, मोहरून येईल सुगंध, ....... च्या सोबतीत, गवसेल जीवनाचा आनंद.
- हिमालय पर्वतावर बर्फाचे खडे, ....... चे नाव घेते, सत्यनारायणापुढे
- एक होती चिऊ, एक होता काऊ, ....... रावांचे नाव घेते, डोके नका खाऊ
- संतांच्या वाणीत आहे, सोन्याच्या खाणी (ज्ञानाच्या), ....... आहेत, माझे कुंकवाचे धनी.
- पाव शेर रवा, पाव शेर खवा, ....... चे नाव घेते, हजार रूपये ठेवा.

— प्रेमकुमार मनोहरराव जवणे.

## एम.ए. भाग -३.

- ज्ञानेश्वराने रचला पाया, तुकाराम झाले कळस ....... राव वृंदावन अन् मी त्यातील तुळस.
- पुजेच्या साहित्यात अगरबत्तीचे पुडे ....... रावांचे नाव घेते सर्वांच्या पुढे.
- छुन - छुन बांगड्या, छुम छुम पैंजण ....... रावांचे नाव घेते, ऐका सारे जण.
- रातराणीचा सुगंध, त्यात मंद वारा ....... रावांच्या नावाचा, भरला हिरवा चुडा.
- खडी साखरेची गोडी अन् फुलांचा सुगंध ....... रावांच्या संसारात स्वर्गाचा आनंद.
- पंच पक्वांनाच्या ताटात वाढले लाडु पेढे, ....... रावांचे नाव घेताना कशाला आढे वेढे
- पतीव्रतेचे व्रत घेवुन, नम्रतेने वागेल ....... रावांचे नाव घेताना आशीर्वाद मागते
- कण्वमुनींच्या आश्रमात शकुंतलेचे माहेर, ....... रावांनी केला मला सौभाग्याचा आहेर.
- नाजुक अनारसे साजुक तुपात तळावे, ....... रावांसारखे पती जन्मोजन्मी मिळावे.
- शिक्षणाने विकसीत होते संस्कृत जीवन ....... रावांच्या संसारात राखीन मी सर्वांचा मान.
- नाव घ्या नाव, आग्रह असतो. सर्वांचा ....... रावांचे नाव असतो ओठांवर पण प्रश्न असतो उखाण्याचा।
- झुळ झुळ वाहे वारा, मंद मंद त्याची होळी, आयुष्य भर सोबत राहे. आम्हा दोघांची जोडी
- तळहातावर मेहंदी रचली त्यावर तेल ही शिंपडले..... रावांचे मन, मी केव्हाच जिंकले.
- संसाराच्या मांडवात, पंचपक्वानाच्या राशी, पोर पोर जेवून गेले. जावई राहाला उपाशी-

— कु. रेणुका श. ठाकरे.

## एम. ए. भाग - १.

- काचेच्या बशीत बदामाचा हलवा, ....... रावांचे
  नाव घेते सासूबाईंना बोलवा.
- आकाशात उडतो पक्षांचा थवा ....... रावांचे
  नाव घ्यायला उखाणा कशाला हवा.
- मंगळ देवी मंगळमाते वंदन करते तुला .......
  रावांचे आयुष्य वाढव हेच प्रार्थना तुला.
- कुलदेवतेपुढे अत्तराचे थेंब, ....... रावांचे नाव
  घ्यायला मी सर्वांच्या पुढे.
- माझा आवडता ऋतु आहे वर्षा, ....... ही माझी
  आरशी अन् मी तीच्या परशा.
- जुईची वेणी जाईचा गजरा ....... आमच्या दोघांवरती
  सगळ्यांच्या नजरा.
- कपात - कप, बशीत बशी, माझी सोडून .......
  बाकी सर्व जनी म्हशी.
- बारीक मणी घरभर पसरले ....... रावांसाठी
  माहेर विसरले.
- विद्या शोभते बुद्धीने, लक्ष्मी शोभते धनाने, .......
  रावांच्या जीवावर जीवन जगते मनाने.
- चांदीच्या ताटात फणसाचे गरे .......
  राव दिसतात बरे वागतील तेव्हा खरे.
- चांदीच्या ताटात जिलेबीचे तुकडे ....... घास भरवते
  मेल्या बोबडं कर इकडे.
- गच्चीवर - गच्ची सिमेंटची गच्ची ....... माझी
  बायको आहे मोठी लुच्ची.
- उशाखालचा शेला पायाखाली आला ....... उठा-उठा
  राव प्रहर दिवस आला.

- कु. रूपाली म. बन्सोडे

एम. ए. भाग - १.

- गिरजा शंकर सीता राम यांना गुरु करू, ........ राव आपण दोघे संसारसागर तरू
- रुपयाची डबी त्यात अत्तराचा बोळा ........ रावांचे बोलणे शंभर रुपये तोळा.
- मंगलदेवी मंगलमाते वंदन करते, लुणा ........ रावांचे आयुष्य वाढो हीच प्रार्थना तुला.
- महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, ........ रावांचे नाव घेऊन हिंदमातेच्या जयघोष करू.
- सागवानी पेटीला सोन्याची कुलूप, ........ रावांच्या हातात कायद्याचे कुलूप
- केळे देते सोलून, पेरु देते चिरून, ........ रावांच्या जीवावर कुंकू लावले कोरून.
- नदी पल्याड नदी मधी पेरला, लसून पतीदेव जादू कळा रूसून आपण दोघे जादू शिकला बसून
- रामाने राज्य दिले, भरताने नाकारले, ........ रावांच्या जीवावर सौभाग्य स्वीकारले.
- चांदीची फरफट सोन्याचे सिट, नवरा म्हणे बायकोला जादू आपण डबलसीट.
- खडी साखरेची गोडी सन फुलांच्या सुगंध, ........ रावांच्या संसारात, स्वर्गाचा आनंद
- रातराणीचा सुगंध, त्यात मंद वारा, ........ रावांचे नावाच्या, भरला हिरवा चुडा
- पंच पक्वांनाच्या ताटात, वाढले लाडू पेढे, ........ रावांचे नाव घेतांना, कशाला आढे-वेढे
- मंदिराचे वैभव, परमेश्वराची मूर्ती, ........ नाव घेऊन करते इच्छापूर्ती.
- सनई आणि चौघडा, वाजे सप्त सुरात, ........ रावांचे नाव घेते ........च्या घरात.
- कपाळावर कुंकू, हिरवा चुडा हाती, ........ राव माझे पति, सांगा माझे भाग्य किती.
- राजहंस पक्षी शोभा देते वनाला, ........ रावांचे नाव घेते, आनंद माझ्या मनाला.
- ओल्याचींब केसांना, टॉवेल दयां पुसायला, ........ रावांचे नाव घेते झालु दया नेसायला.

— कु. शुभांगी प. जोगेकर.

एम.ए. भाग - १.

- आषाढी कार्तिकी एकादशीला पंढरपुरात होते दाटी ...... रावांचे नाव घेते तुमच्यासाठी.
- १५ ऑगस्ट १९४७ साली देश स्वतंत्र झाला. ...... रावांच्या जीवनात मला आनंद मिळाला.
- जगन्नाथपुरीच्या मंदिरात आहे तलाव, तलावाच्या समोर आहे नंदी ...... रावांच्या संसारात मी आहे आनंदी.
- ब्रह्मदेवाने स्त्रीपुरुषाच्या पाडल्या ब्रह्मगाठी ...... रावांचे नाव घेते हळदीकुंकवाच्या दिवशी.
- सुखी जीवनात वागावे प्रेमाने रावांच्या संसारात राहते मी सुखाने.
- आयुष्याच्या घटना लक्षात राहाव्या म्हणून लिहतात डायरी ...... रावासोबत चढत आहे मी संसाराची पायरी.
- मोरशी हे माझे गाव छान आहे. ...... रावासोबत चालवित आहे मी संसाराची नाव.
- सुंदर आहे मोठे पाळवंट, ...... रावांच्या जिवनात मला मिळाला मोठा आनंद.
- पिंपळाच्या झाडावर किलबिल करीत होते पक्षी ...... रावांच्या संसारात परमेश्वर आहे साक्षी.
- वसंत ऋतुत आंब्याला येतात पाने, रावांच्या संसारात राहते मी सुखाने
- ताजमहाल बांधणारे कारागीर होते कुशल ...... रावांचे नाव घेते तुमच्यासाठी स्पेशल.
- स्वर्गाच्या नंदनवनात होत्या केळी ...... रावांचे नाव घेते संक्रांतीच्या वेळी.
- सोन्याचे घागर अमृताने भरावे, ...... रावांची सेवा मला जन्मोजन्मी मिळावी.
- रुसलेल्या राधेला कृष्ण म्हणतो हास, ...... रावांचे नाव घेते तुमच्यासाठी खास.

- कु. वैष्णवी ह. डहाके.

एम.ए. भाग - ३.

- नऊवारी साडी आहे माझ्या महाराष्ट्राचा मान ........ राव आहेत माझा जीव की प्राण.
- रुसलेल्या राधेला कृष्ण म्हणतो हासं ........ राव मला म्हणतात तू सगळ्यापेक्षा खास!
- सासूने दिला सोन्याचा आहेर ........ रावांच्या सोबतीने जिंकेन सासर आणि माहेर!
- दारी होती तुळस तिला घालते पाणी आधी होते आई - बाबांची लाडकी आता झाले - ........ रावांची राणी.
- कुंकू लावते लाल, त्यात पडला मोती ........ राव माझे पति मी त्यांची सौभाग्यवती.
- इंग्रजी भाषेत भितीला म्हणतात वॉल चंद्राला म्हणतात मून ........ रावांचे नाव घेते कोणाची सून!
- गुलाबाच्या फुलाला पाकळ्या आहे दाट ........ रावांचे नाव घेते पाच मिनटाच्या आत.
- नाव हवा, नाव घ्या, नावात काय विशेष ........ राव माझे मिस्टर तर मी त्यांची मिसेस.
- गणेशाला वाहतात दुर्वा, महेशाला वाहतात बेल ........ रावांच्या जिवावर फुलली आहे, जीवनवेल.
- नाव घेण्यास आग्रह असतो, सद्भावनेचा वास रावांचे नाव घेते तुमच्या करता खास.
- आकाशात उडती नयन रम्य पक्ष्यांचे थवे, सातोजन्मी पती म्हणून मला ........ हवे.
- सुर्यदेवाच्या आगमनाने झरट्यावरून आले पक्षी ........ रावांचे नाव घेते परमेश्वर आहे साक्षी.
- मीठा शिवाय अधुरी पंचपक्वानाची गोडी नाव घेते ........ रावांचे पण लाज वाटते थोडी.
- कारले असते कडू साखर असते गोड ........ रावांच्या आणि माझ्या जोडीला नाही कुठे तोड - कु. स्वाती वि. निमजे

एम.ए. भाग -१.

- समानहितासाठी बाबासाहेब प्रस्थापितांसोबत भांडले, .......
शवांसोबत मी माझ्या आयुष्याचे गणित मांडले.
- शिवराज्यात भ्रष्टाचाराला मुळीच नव्हता वाव ....... शवांच्या
डोळ्यात माझ्या आठवणीचे गाव.
- बहुजनांची प्रगती हा शिवधर्माचा श्वास आहे, ....... शव माझ्या
काळजाचा श्वास आहे.
- रूढीवर आघात करते सावित्रीबाईंच्या कविता, वाट पाहतोय
मी कधीची केवळ शवा करिता.
- इतिहासाच्या गर्भात अनेक रहस्य दडले आहेत, केवळ .......
शवांसाठी माझे मन हे अडले आहे.
- महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात शिवराय सिंहासारखे वावरले, .......
.. शवांच्या भेटीसाठी, मन मी आवरले.
- अनेक महान ग्रंथ देणारी भाषा होती प्राकृत .......
शवांना केले मी मनापासून स्विकृत
- होता राजा जनक कृषिसंस्कृती जपणारा .......
शवांच्या डोळ्यातून बोलतो भाव मला जपणारा.
- चक्रधरस्वामींनी दिले जगाला समतेचे तत्वज्ञान
....... शवांचे जीवन हे माझे सर्वज्ञान.
- राजा जनतेसमोर होता मोठा आदर्श .......
शवांना पाहताक्षणी होतो मनाला हर्ष.
- २६ जानेवारीला राष्ट्र झाले गणराज्य, आता
माझ्या मनावर केवळ शवांचे राज्य.
- संसारात माझ्या आनंदाची वृष्टी, .......
शवांसोबत वेढीन मी निराळी सृष्टी.
- हळद लावले ठसठशीत, कुंकू लावले किंचीत
....... शवांचे माझे पूर्व जन्मीचे संचीत.
- प्रेमरूपी सागरात पती-पत्नीची नौका, .......
शवांचे नाव घेते सर्वजण ऐका !
- ग्रंथ म्हणजे ज्ञान, त्याग, ध्यान ....... शवांचे नाव घेते
फक्त ग्रंथांचेच ध्यान -

कु. पल्लवी न. ठाकरे

## एम. ए. भाग - २

- दुसऱ्या दरडीत गुलालाचा भार, त्याच्री किल्ला होसेवर, तिसऱ्या दरडीत हळदी कुंकवाचे पुडे, रुखवत उघडले सर्व आयाबायांच्या पुढे.
- आला आला रुखवत त्यात होता भोपळा, काको काकीच्या लग्नातून तीव झाला मोकळा. आला आला रुखवत त्यात होता तवा विहीणी कपडे धुतले पानिपतची लढाई झाली नवा.
- महादेवाच्या पिंडिसमोर, उभा आहे नंदी, आयाताचे क्षेत्रफळ = लांबी × रुंदी
- मी आणि माझे विद्यार्थी, दररोज खाते काजू, चौरसाची परिमिती = 4 × बाजू.
- खोप्यात खोपा सुगरणीचा खोपा, विक्री वजा खरेदी = नफा.
- हिमालय पर्वतावर बर्फाच्या राशी, ......चे नाव घेते लग्नाच्या दिवशी
- अनुआ की डाली पर बोले कोयलीया ...... के संग बिते सारी उमरिया.
- शंकराच्या पिंडीवर नागोबाचा वेढा ही माझी म्हैस आणि मी हिचा रेडा.
- मी होती माळीवर, प्रकाश पडला साडीवर, ......रावांचे नाव लिहिते, हिरो होन्डा गाडीवर.
- पिंपळाच्या पानावर पाय ठेवू कसं, लग्नच नाही झालं तर नाव घेवू कसं.
- केळीच पान टररर फाटे, त्या बेवड्याचं नाव घेतलं तर कसतरी वाटे.
- गावातल्या मंदिरात करत होती आरती ...... राव गेले वरतं मी राहली खालती.
- केंद्रात केंद्र दुधाचे केंद्र माझे ......राव दिसतात धर्मेंद्र.
- चांदीच्या ताटात मुठभर गहू, लग्नच नाही झालं तर नाव कोणाचं घेवू
- भाग्याचे कुंकु, प्रेमाचा आहेर ......रावांचे नाव घेवून मी होत विसरते मी माहेर.
- चिवड्यात घालतात खोबऱ्याचे काप ...... राव समजेल ओळखाडे आप.
- सुहासिनीने करावे नेहमी सोळा शृंगार ...... आहे माझे प्रेमळ भरतार.

— मनोज र. बोसर

एम. ए. भाग. १.

- निसर्ग सौंदर्याने बहरलेला खंडाळ्याचा घाट ....... रावांनी धरली परमार्थाची वाट.
- कोकणात नारळाच्या झाडाला म्हणतात कल्पवृक्ष ....... राव म्हणतात श्रद्धेविना जीवन वृक्ष.
- प्रभू रामचंद्राला बोरे अर्पुण शबरीने जीवन केले कृतार्थ ....... राव म्हणतात श्रद्धेविना जीवनाला नाही अर्थ.
- सुदाम्याचे पोहे केले कृष्णाने भक्षण ....... राव म्हणतात संकटकाळी मी करीन देशाचे रक्षण.
- अबोलीच्या फुलाचा गंध काही कळेना ....... चे नाव घेण्यास शब्द काही जुळेना.
- सुपभर सुपारी निवडू कशी,
  गळ्यात माळ वाकू कशी,
  पायात पैंजण चालू कशी
  ....... बसले मित्रापाशी
  कपाटाची चावी मागू कशी ?
- मराठी भाषा महाराष्ट्राची अस्मिता ....... चे नाव घेते ....... ची चारुता.
- कुंकवाचे पुडे रुखवत उघडले, आयाबायांच्या पुढे. चवथ्या पुडीत मुलीची थाई, रुखवंत उघडली नवऱ्याची आली.
- पाचव्या पुडेत केळीची फणी, रुखवंत उघडले नवऱ्याची बहीण
- सहाव्या पुडेत चंद्राची कोर, रुखवंत उघडली सासू माझी थोर.
- आला आला रुखवंद वाजत गाजत, आत उघडून बघती तर बदामाचे ताट.
- ....... रावांच्या बरोबर मन गेले गांगरून, आई बाबांच्या आशीर्वादाची छाप घेते पाघरून घेवून.

→ कु. वृषाली प्र. नवले.

## एम॰ ए॰ भाग - १

- मंदिरात वाहते, फुल आणि पान, ....... रावांचे नाव घेते, देऊन सर्वांचा मान.
- गोकुळा सारखं सासर, सारे कसे हौशी, ....... रावांचे नाव घेते, तिळ संक्रांतीच्या दिवशी.
- कपाळाचा कुंकु जसा चांदण्यांचा हसा, ....... रावांचे नाव घेते, सारे जण हासा.
- रातराणीचा सुगंध, त्यात मंद वारा, ....... रावांचे नावांचा भरला हिरवा चुडा
- खडी साखरेची गोडी अन् फुलांचा सुगंध, ....... रावांच्या संसारात स्वर्गाचा आनंद
- घातली मी वरमाला हसले ....... राव गाली, थरथरला माझा हात लज्जेने चढली लाली.
- जेव्हा मी त्यांना पाहिले चोरून, विचार करते मूक होवून घडविले देवानी ....... रावांना जीव लावून
- धरला यांनी हात, वाटली मला भिती, हळूच म्हणाले ....... राव अशीच असते प्रिती.
- हृदयात दिले स्थान, तेव्हा दिला हातात हात, ....... रावांच्या जीवनात लावितो प्रीतीची फुलवात
- नव्हती कधी गाठ भेट, एकाच झाली नजरा नजर, आई वडील विसरला ....... रावांसाठी सुटला प्रितीचा पाझर
- पौर्णिमेचा चंद्र आकाशात दिसतो साजरा ....... रावांनी आणला मला मोगऱ्याचा गजरा.
- वेळेचे काळचक्र फिरते रात्रंदिवस कधी पुनव कधी अवस ....... रावांचे नाव घेते आज हळदी कुंकवाचा दिवस.
- प्रेमळ शब्दामागे भावना असते कौतुकाची ....... रावांच्या साथीने सुरुवात करते सहजीवनाची.
- करवंदाची साल चंदनाचे खोड, ....... रावांचे बोलणे अमृतापेक्षा गोड.
- वसंतातली डाळ पन्ह, देती गोडवा, ....... रावांसह मला आपला आशीर्वाद हवा

कु॰ शुभांगी व॰ निंबारकर

अशा नव - वधुवरांसाठी खास लोकसाहित्याचा ठेवा आपल्या संस्कृतीने दिलेला आहे. माझ्या एम. ए. भाग एकच्या सर्व विद्यार्थ्यांनी 'उखाण्याचे संकलन' करून लोकसाहित्याचे नवे पर्व तयार केलेले आहे, असे म्हणण्यास हरकत नाहि. कारण परस, शेंबाट, मोर्शी, अमडापूर, राजोरा अशा विविध ग्रामीण भागातील स्त्रीच्या मनातील संवेदना या संकलनातून व्यक्त होत आहे.

या संकलनासाठी ही संधी देणारे मराठी विभाग प्रमुख डॉ. पंजाबराव पुंडकर सर यांचे मी मनःपूर्वक आभार मानते. मला नेहमीच शैक्षणिक कामात उत्स्फुर्तपणे मदत करणारे माझे गुरू प्रा. लक्ष्मण पवार, डॉ. चंदू पाखरे व डॉ. राजेश मिरगे, प्रा. विनोद तेलमोर त्यांच्याशिवाय हे संकलन शक्य नव्हते. मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच या संकलनात डिझाईन काढून देवून सौंदर्यात भर टाकणारी माझी प्रिय मैत्रिण कु. प्रियंका वरघे, कु. छाया बाहेकर, सौ. प्रिती निमघरे याचे सुध्दा आभार मानते.

मा. प्राचार्य डॉ. जे. डी. वडते सर यांनीही मला वेळोवेळी शिक्षणाविषयी विचारपूस करून प्रोत्साहित केल्यामुळे आज हे संकलन कार्य पुर्णत्वास गेले आहे. त्यांचे उपकार मला कधीही विसरता येणार नाही.

शेवटी शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या बहुमोल कार्यास व स्मृतीस विनम्र अभिवादन करून हे संकलन कार्य त्यांच्या चरणी अर्पण करून मी माझे मनोगतास इथे पूर्णविराम देते.

धन्यवाद .......

संपादक -
डॉ. स्वाती विठ्ठलराव चोरे.

- हिरवी हिरवी सांभाराची काडी, ....... रावांनी पिक्चर दाखवली माहेरची साडी.
- लाल लाल टरबूज काळ्या काळ्या बिया ....... -नी पिक्चर दाखवला मैंने प्यार किया.
- लांब - लांब केसांची वेणी दाट ....... रावांचे नाव घेते ५ मिनिटांच्या आत.
- संसाराच्या सागरात प्रेमाची होडी रावांमुळे आली माझ्या आयुष्यात गोडी.
- चांदीच्या ताटात रुपया वाजतो खणखण रावांचे नाव घेऊन सोडते कंकण
- एक किलो गहू वर एक किलो गहू, लग्नच नाही झालं नाव कोणाचं घेऊ.
- मोहनारी माया, नाही मत्सर हेवा, ....... रावांचे नाव घेते नीट लक्ष ठेवा.
- आमच्या ह्यांचे घर होते माकडांचे, आमच्या ह्यांचे घर होते माकडांचे ....... रावांचे नाव घेते सासूबाईच्या माकडांचे.
- सुंदर सुंदर हरिणाचे इवले इवले पाय, आमचे हे अजून कसे नाही आले. गटारात पडले की काय?
- चांदनी पाण्यात मुग्ध कळी हसली, ....... रावांच्या प्रेमात मी नकळत फसली.
- आशेच्या रंगमंच्यावर स्वप्नांचे पडसाद ....... रावांचे नाव घेते तुम्हा सर्वांच्या आशीर्वाद
- सर्वांना नमस्कारासाठी जोडले हो हात ....... रावांचे नाव घेते पण सोडा माझी वाट.
- आंबा गोड, ऊस गोड, त्याही पेक्षा, अमृत गोड, ....... रावांचे नाव आहे अमृतपेक्षा गोड.
- चांदीच्या तोरड्या चमचम वाजल्या ....... रावांच्या वहिनी टेबलावर नाचल्या.
- झांबर झुंबर चालला होता, घड्याळाकडे पाहत होती, घड्याळीत वाजला एक, मी लय श्रीमंताची लेक.

—कु. वैशाली ग. खेटे.

एम. ए. भाग - १.

- पित्याने दिली विद्या, मातेने दिले गृहशिक्षण, ...... राव मिळाले हेच माझे भूषण.
- शाळेच्या ग्राउंडवर खेळत होते गेम, तिकडून आले ...... राव त्यांनी विचारले व्हॉट इज युवर नेम.
- माहूर गडावर रेणुकेची वस्ती ...... रावांचे मिळावे आयुष्य माझ्यापेक्षा जास्ती.
- शितल आहे चांदणे, वारा आहे मंद, ...... रावांना सिनेमाचा भारीच छंद.
- वैचारिक प्रगल्भतेचे ...... राव मला लाभले म्हणून जीवनी स्वप्न माझे साकारले.
- कर्तव्य करविता परमेश्वर त्यावर टाकले मी भार, ...... रावांचे नाव घेते, कर हेवा नौका पार.
- कळत नाही माझेच मला, आहे स्वप्न की भास, ...... रावांचे नाव घेते तुमच्यासाठी खास.
- विनय हाच खरा स्त्रीचा अलंकार, ...... रावांच्या सहवासात होवो ईश्वर आशा साकार.
- एकनाथाच्या घरी, हरि पाणी भरतो कावडीने, ...... रावांच्या नाव मी घेईन आवडीने.
- लज्जेचे बंधन असले तरी नाव आहे ओठी ...... रावांचे नाव घेते तुमच्या आग्रहासाठी.
- नेत्रीच्या निरंजनात ठेवले प्रीतीची फुलवात, ...... रावांच्या साक्षीने संसाराला करते सुरुवात.
- बरेच दिवसांनी आकांक्षा आज आली साकार, ...... रावांनी केलाय माझा पत्नी म्हणून स्विकार.
- मुंग्याच्या सहवासात विकसते कळी, ...... रावांच्या साक्षीने लिहिते सौभाग्याच्या ओळी.
- केस माझे कुरळे, सावली पडली गालावर, ...... रावांचे नाव घेते मैत्रिणींच्या बोलावर.

- कु. दिपाली वि. निकम.

एम. ए. भाग - २.

- सह्याद्री पर्वतावर होते शिवरायांचे दर्शन, ........ रावांच्या प्रेमासाठी अखंड जीवन अर्पण.
- आकाशात उडणाऱ्या राजहंसाचे काळे, निळे डोळे, ...... रावांचे मन माझ्या हृदयात फिरे.
- कण्व ऋषींच्या आश्रमात शकुंतलेचे माहेर, ...... रावांनी दिले मला सौभाग्याचे माहेर, कळी उमलली खुलून हसली स्पर्श होता वाऱ्याचा, भाळी कुंकूम टिळा रेखीते ...... रावांच्या नावाचा.
- मित्र-मैत्रिणींच्या मेळ्यात हास्याचा येत उधाण शब्दांचे सुटतात बाण - जीव होतो हैराण पण हळूच सांगते कानात, ....... राव आहेत माझे जीव की प्राण.
- सोन्याच्या ताटात खडीसाखरेची वाटी, ...... रावांचे नाव घेते सात जन्मासाठी
- आई वडीलांच्या वियोगाचे दुःख ठेवून मनात हसतमुखाने प्रवेश केला मी, ....... रावांच्या जीवनात.
- तुळशीची करते पूजा शंकराची करते आराधना, ....... रावांना दीर्घायुष्य लाभो हीच परमेश्वराला प्रार्थना.
- खाण तशी माती, ....... राव माझे पती आणि मी त्यांची सौभाग्यवती.
- बागेत फूल गुलाबाचे, माझ्या मनात नाव ....... रावांचे
- तिरंगी झेंड्यावर अशोकचक्राची खूण, नाव घेते ....... ची सून.
- दिन दुबळ्यांचे गाऱ्हाणे परमेश्वराने ऐकावे, आई वडील हेच देवा सारखे मिळाले, आणखी काय मागावे.
- विटावर विटा सात विटा, ....... रावांचे नाव घेते सगळी आता फुटा
- जीवनाच्या सागरात पती पत्नीची नौका, ....... रावांचे नाव घेते, सर्वांनी लक्ष देऊन ऐका.
- पेढ्यावर पेढे पाच पेढे, ....... रावांचे नाव घेते तुमच्या सर्वांच्या पुढे.
- मुंबई ते पुणे पेरला होता लसून ...... राव गेले थकून, आता त्यांना पालखीत बसून.
- खोक्यात खोका टि.व्ही.चा खोका ....... राव गप्प बसा नाही तर देईन ठोसा.
- मोगऱ्याचा गजरा लावते मी वेणीला, ....... रावांची आठवण येते प्रत्येक क्षणाला
- सोन्याच्या वाटीत घास भरवते बाळाला, रावांचे नाव घेताना लाज कसली गिरीजेला.

— अक्षय अ. लोखंडे.

एम. ए. भाग - २.

- सह्याद्री पर्वतावर होते शिवरायांचे दर्शन, ....... रावांच्या प्रेमासाठी अखंड जीवन अर्पण.
- आकाशात उडणाऱ्या राजहंसाचे काळे, निळे डोळे, ....... रावांचे मन माझ्या हृदयात फिरे.
- कण्व ऋषींच्या आश्रमात शकुंतलेचे माहेर, ....... रावांनी दिले मला सौभाग्याचे आहेर,
- कळी उमलली खुलून हसली स्पर्श होता वाऱ्याचा, भाळी कुंकुम दिला रेखीले ....... रावांच्या नावाचा.
- मित्र-मैत्रिणींच्या मेळ्यात हास्याला येत उधाण शब्दांचे सुटतात बाण - जीत होतो हैराण पण हळूच सांगते कानात, ....... राव आहेत माझे जीव की प्राण.
- सोन्याच्या ताटात खडीसाखरेची वाटी, ....... रावांचे नाव घेते सात जन्मासाठी
- आई वडीलांच्या वियोगाचे दुःख ठेवून मनात हसतमुखाने प्रवेश केला मी, ....... रावांच्या जीवनात.
- तुळशीची करते पूजा शंकराची करते आराधना, ....... रावांना दीर्घायुष्य लाभो हीच परमेश्वराला प्रार्थना.
- खाण तशी माती, ....... राव माझे पती आणि मी त्यांची सौभाग्यवती.
- बागेत फूल गुलाबाचे, माझ्या मनात नाव ....... रावांचे
- तिरंगी झेंड्यावर अशोकचक्राची खूण, नाव घेते .......ची सून.
- दिन दुबळ्यांचे गाऱ्हाणे परमेश्वराने ऐकावे, आई वडील हेच देता सारखे मिळाले, आणखी काय मागावे.
- विटावर विटा सात विटा, ....... रावांचं नाव घेतं सगळी आता फुटा
- जीवनाच्या सागरात पती पत्नीची नौका, ....... रावांचं नाव घेतं, सर्वांनी लक्ष देऊन ऐका.
- पीठावर पीठ पाच पीठं, ....... रावांचे नाव घेते तुमच्या सर्वांच्या पुढे.
- मुंबई ते पुणे पेरला होता लसून ....... राव गेले थकून, आणा त्यांना पालखीत बसून.
- खोक्यात खोका टि.व्ही.चा खोका ....... राव गप्प बसा नाही तर देईन ठोसा.
- मोगऱ्याचा गजरा लावते मी वेणीला, ....... रावांची आठवण येते प्रत्येक क्षणाला
- सोन्याच्या ताटात घास भरवते बाळाला, रावांचे नाव घेताना लाज कसली लेकाला.

— अक्षय अ. भोसले.

एम० ए० भाग - १.

- कोल्हापूरला आहे महालक्ष्मीचा वास, मी भरविलो ....... ला जलेबीचा घास.
- पुरणपोळीत तूप असावे साजूक .... आहेत आमच्या फार नाजूक.
- सितेसारखे चारित्र्य, लक्ष्मी सारखं रूप, ....... मला मिळाली आहे अनुरूप.
- गाडीत गाडी डेक्कन क्वीन ....... आहे माझी ब्युटी क्वीन.
- सूर्याच्या किरणांचा प्रकाश पडला नारळाच्या झाडावर ........ चा पूर्णपणे हक्क.
- प्रेमाच्या शहरात नाचतो मोर ....... शी केलं लग्न नशीब माझं थोर.
- कृष्णाला बघून राधा हसली ....... माझ्या हृदयात जाऊन बसली.
- गोड मधुर आवाज करी कृष्णाची बासरी ....... ला घेऊन जातो मी तिच्या सासरी.
- प्रेमाची कविता, प्रेमाचे बोल ....... माझी लाखात एक.
- खडी साखरेची गोडी अन् फुलांचा सुगंध ....... रावांच्या संसारात, स्वर्गाचा आनंद
- मंदिराचे वैभव, परमेश्वराची मूर्ती, ....... रावांचे नाव घेऊन करते इच्छापूर्ती.

— गौरव स० कोहळे

एम॰ए॰ भाग - १.

- कोल्हापूरला आहे महालक्ष्मीचा वास, मी भरवितो .......
  ला जलेबीचा घास.
- पुरणपोळीत तूप असावे साजूक .... आहेत आमच्या
  फार नाजूक.
- सितेसारखे चारित्र्य, लक्ष्मी सारखं रूप, .......
  मला मिळाली आहे अनुरूप.
- गाडीत गाडी डेक्कन क्वीन ....... आहे माझी
  ब्युटी क्वीन.
- सूर्याच्या किरणांचा प्रकाश पडला [illegible] झाडावर
  ....... चा पूर्णपणे हक्क.
- प्रेमाच्या रानात नाचला मोर ....... शी केलं लग्न
  नशीब माझं थोर.
- कृष्णाला बघून राधा हसली ....... माझ्या
  हृदयात जाऊन बसली.
- गोड मधुर आवाज जशी कृष्णाची बासरी .......
  ला घेऊन जातो मी तिच्या सासरी.
- प्रेमाची कविता, प्रेमाचे लोक .......
  माझी लाखात एक.
- खडी साखरेची गोडी अन् फुलांचा सुगंध .......
  रावांच्या संसारात, स्वर्गाचा आनंद
- मंदिराचे वैभव, परमेश्वराची मूर्ती, .......
  रावांचे नाव घेऊन करते इच्छापूर्ती.

— गौरव स. कोहळे

एम. ए. भाग - १.

- आला आला दिवाळीचा, सण हा मोठा ....... राव असताना, नाही आनंदाला तोटा.
- गणरायासमोर ठेवल्या पंचपक्वान्नाच्या राशी ....... रावांचे नाव घेते, गणेशचतुर्थीच्या दिवशी.
- आषाढीला पंढरीत येतात सारे वारकरी आणि संत माझ्या आणि ....... रावांच्या सुखाला नको कुठलाच अंत.
- लग्नात मधुर सनई, रिसेप्शनला डीजेचा जलवा, ....... रावांना आवडतो खायला गाजराचा हलवा.
- साताजन्माचं नात बांधतात, सप्तपदीची पाऊले सात, ....... रावाच नाव घेते आजोबांची नात.
- वृक्षाच्या छायेत वनदेवी घेते विसावा, ....... रावाचे नाव घेते सर्वांचा आशीर्वाद असावा.
- नेत्रांच्या निरंजनी अश्रूंच्या वाती, ....... रावासाठी सोडली माझ्या माहेरची नाती.
- चिवड्यात घालतात खोबऱ्याचे काप, ....... रावाच्या समवेत ओलांडले माप.
- तुळजाभवानीची कृपा आणि तिरूपतीच्या आशीर्वाद, माहेरचे निरंजन आणि सासरची फुलवात, ....... रावांचे नाव घेऊन करते मी संसाराला सुरूवात.
- सप्तपदीच्या या वाटेवर मी नेहमीच तुला साथ देईन, तुझ्यासाठी एखादा शर्ट घेताना माझ्यासाठीही दोन साड्या आणि चार ड्रेस घेईन.
- चंद्राचं प्रतिबिंब पडलं तळ्यात सा ....... रावांच नाव घेते, मैत्रिणींच्या मेळ्यात.
- संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवते आकाशात, रावांचा नाव ऐकायला सगळे बसले प्रकाशात.
- गोकुळ सारखा संसार सगळे करते होती, ....... रावांचं नाव घेते तिळ संक्रांतीच्या दिवशी.
- मोह नाही, माया नाही, नाही मत्सर हेवा, ....... रावाचे नाव घेतो नीट लक्ष ठेवा.
- आदर्श पती-पत्नी म्हणून सांगतात, नल - दमयंती ....... नी घास द्यावा ही माझी पहिलीच विनंती.

कु. दिपाली गणेश घावंडे

## एम. ए. भाग - ३.

- शुभवेळी शुभदिनी आली आमची वरात ......, शवांचे नाव घेते
  पहिले पाऊस घरात.
- जिवणाच्या वाटेवर पाऊस नवीन ठेवते सागळ्यांच्या मान राखून
  नाव ....... चे घेते.
- खण खण कुदळी मण मण माती उभारल्या भिंती चितारले
  खांब ; सासूबाईंच्या पोटी अक्काबाईंच्या पाणी
- गोकुळच्या गौवळणी रास क्रिडा खेळी ....... शवांचे
  नाव घेते शुभ संधीच्या वेळी.
- मथुरेच्या बंदी गृही कृष्ण जन्मी आला ...... शवांचे नाव घेण्या
  उशीर कशाला।
- गोकुळच्या गोपी कृष्णाची पाहे वाट शवांचे नाव घेते त्यांची
  आयुष्याची साथ.
- विठ्ठल माझा पिता, रुक्मिणी माझी माता ....... शवांचे नाव घेते
  ऐकून घ्या पदर सोडा आता.
- संसाराची गाडी ही देव चालविते....... शवांचे नाव घेता माया ही भुलविते
- श्रीमद भागवतात ज्ञानाचा पूर ....... शवांचे नाव घेते पंढरपूर
  माहेर आहे दूर.
- शेगावचे गजानन, शिर्डीचे साई ....... शवांना जन्म देणारी
  धान्य ती आई.
- चातुर्मासामध्ये नामाचा गजर ....... शवांचे नाव घेण्यासाठी
  मी आहे हजर.
- ब्रह्माने केली उत्पती, विष्णूने केले पोषण .......
  शवांचे नाव घेते शंकरजी आहे रक्षण.
- कृष्णाने अर्जुनाला सांगितली गीता ....... शवांना
  जन्म देणारी धन्य ती माता
- जशी आकाशात चंद्राची कोर ....... पति मिळायला
  माझे नशीब थोर
- भाव तेथे शब्द, शब्द तेथे कविता ....... चे नाव घेते
  तुमच्या आग्रहाकरिता.
- एक दिवा दोन वाती एक शिंपल दोन मोती अशीच राहु दे माझी
  व ....... शवांची प्रेम ज्योती.....
- प्रेमरूपी दिव्यात लावले प्रीतीची वात ....... शवांचे नाव घ्यायला
  केली आजपासून सुरुवात -

— कु. अंकिता दि. पाटील.

- कोल्हापूरला आहे महालक्ष्मीचा वास, मी भरविते ....... ला जलेबीचा घास.
- पुरणपोळीत तुप असावे साजुक .... आहेत आमचे फार नाजुक.
- सितेसारखे चारित्र्य, लक्ष्मीसारखे रूप, ....... मला मिळाली आहे अनुरूप.
- गाडीत गाडी डेक्कन क्वीन ....... आहे माझी ब्युटी क्वीन.
- सूर्याच्या किरणांचा प्रकाश पडला स्वच्छ झाडावर ....... चा पूर्णपणे हक्क.
- प्रेमाच्या राज्यात नाचतो मोर ....... शी केले लग्न नशीब माझे थोर.
- कृष्णाला बघून राधा हसली ....... माझ्या हृदयात जाऊन बसली.
- गोड मधुर आवाज करी कृष्णाची बासरी ....... ला घेऊन जातो मी तिच्या सासरी.
- प्रेमाची कविता, प्रेमाचे लेख ....... माझी लाखात एक.
- खडी साखरेची गोडी अन् फुलांचा सुगंध ....... रावांच्या संसारात, स्वर्गाचा आनंद
- मंदिराचे वैभव, परमेश्वराची मूर्ती, ....... रावांचे नाव घेऊन करते इच्छापूर्ती.

— गौरव स. कोहळे

## एम० ए० भाग - १.

- कोल्हापूरला आहे महालक्ष्मीचा वास, मी भरविते ....... ला जलेबीचा घास।
- पुरणपोळीत तूप असावे साजूक .... आहेत आमचे फार नाजूक.
- सितेसारखे चारित्र्य, लक्ष्मी सारखं रूप, ....... मला मिळाली आहे अनुरूप।
- गाडीत गाडी डेक्कन क्वीन ....... आहे माझी ब्युटी क्वीन.
- सूर्याच्या किरणांचा प्रकाश पडला ऐनवेळ माझ्यावर ........चा पूर्णपणे हक्क.
- प्रेमाच्या शेतात नाचतो मोर ....... शी केले लग्न नशीब माझे थोर.
- कृष्णाला लागून राधा बसली ....... माझ्या हृदयात जाऊन बसली।
- गोड मधुर आवाज करी कृष्णाची बासरी ....... ला घेऊन जाते मी तिच्या सासरी.
- प्रेमाची कविता, प्रेमाचे बोल ....... माझी लाखात एक.
- खडी साखरेची गोडी अन् फुलांचा सुगंध ....... रावांच्या संसारात, स्वर्गाचा आनंद
- मंदिराचे वैभव, परमेश्वराची मूर्ती, ....... रावांचे नाव घेऊन करते इच्छापूर्ती.

— गौरव स. कोहळे